



दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■






●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १५९ ●सोमवार, दि. ०८ सप्टेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


# पालकमंत्री अजितदादांकडून अपेक्षा नाही

## निदान पंकजाताई तुम्ही तरी बालाघाटावरील डोंगररांगा वाचवा!

### महसूल व पोलिस प्रशासनाच्या संगनमताने गौण खनिज माफियांचा धुमाकूळ : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील निसर्गसंपन्न बालाघाट डोंगररांगा महसूल आणि पोलिस प्रशासनाच्या संगनमताने चालणाऱ्या गौण खनिज माफियांच्या अवैध उत्खननामुळे पोखरून नष्ट होत आहेत. सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरण प्रेमी यांच्याकडून सातत्याने तक्रारी होऊनही प्रशासनाने डोळेझाक केल्याचा



आरोप होत आहे. पालकमंत्री अजितदादा पवार हे स्वतःच या माफियांची पाठराखण करीत असल्याचे चित्र दिसत असल्याने त्यांच्याकडून कारवाईची अपेक्षा ठेवणे व्यर्थ ठरेल, अशी टीका सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे. त्यांनी पर्यावरण व हवामान बदल मंत्री पंकजाताई मुंडे यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर



## जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याची जबाबदारी प्रशासना बरोबरच जिल्ह्यातील नागरीकांची सुद्धा आहे: नवनीत कॉवत

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील काही नागरिकांकडून ठराविक समाजाला लक्ष करुन त्यांचेवर आक्षेपार्ह विधाने करून, सोशल मिडीयावर आक्षेपार्ह मजकूर/पोस्ट प्रसारित करून, बॅनर्स फाडून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. बीड जिल्ह्यातील नागरीकांना बीड पोलीसांकडून असे आवाहन करण्यात येते की, सर्वांनी बीड जिल्ह्याचे वातावरण सौहार्दपूर्ण व शांततापूर्ण ठेवावे. कोणाच्याही आक्षेपार्ह विधानांना, सोशल मिडीयावरील आक्षेपार्ह पोस्ट ला तात्काळ, कोणताही विचार न करता प्रतिसाद देऊ नये. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे.



**जिल्ह्यातील शांतता भंग करण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही. समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करणारा, सार्वजनिक शांततेस बाधा आणणारा कोणीही असला तरी त्याच्याविरुद्ध कठोर कारवाई करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल असे पोलीस अधीक्षक श्री.नवनीत कॉंवत यांनी स्पष्ट केले आहे.**

## गणपती विसर्जनादरम्यान ५ जणांचा मृत्यू, ११ बेपत्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

अनंत चतुर्दशीनिमित्ती (०६ सप्टेंबर २०२५) राज्यभरात १० दिवसांच्या गणरायाचे वाजत गाजत विसर्जन करण्यात आले. पुण्यातील विसर्जन मिरवणुका ३१ तासानंतर थांबल्या. मुंबईमध्ये जवळपास सर्व गणपतींचे विसर्जन करण्यात आले आहे. मात्र लालबागचा राजा अजूनही विसर्जनाच्या प्रतिक्षेत आहे. एकीकडे धुमधडाक्यात राज्यभरात लाडक्या बाप्पाला



निरोप देण्यात आला. मात्र, दुसरीकडे गणेश विसर्जना दरम्यान विविध घटनांमध्ये ५ व्यक्तींचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली. तसेच ११ व्यक्तींचा अजूनही शोध सुरू आहे. महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यांमध्ये गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्यामुळे गणरायाला निरोप देण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक घराबाहेर पडत असतात.

▶▶ उर्वरित पान २ वर

## जातीवाद संपवून समाजात समतेची नवी सुरुवात व्हावी : धनंजय मुंडे

- दीपक थोरातांच्या सामाजिक कार्याचे आ. धनंजय मुंडेंकडून कौतुक
- बीडमध्ये सत्यशोधक पुरस्कारांचे धनंजय मुंडे यांच्या हस्ते वितरण



**● यावेळी स्वर्गीय एकनाथ आवाड यांनी उभा केलेला पात्र लाभार्थींच्या गायरानचा लढा मी हाती घेणार असेही धनंजय मुंडे यांनी म्हटले. यावेळी मी माझी मातृ तुल्य गयाबाई आवाड यांचा सत्कार करण्याचे भाग्य मला मिळाले यावेळी मी भारावून गेलो, असेही मुंडे म्हणाले.**

**बीड । प्रतिनिधी**

हा महाराष्ट्र पुरोगामी विचारांचा आहे. मात्र अलीकडच्या काळात महापुरुषांना जातिवादाच्या चष्म्यातून पाहिले जात आहे. ही प्रवृत्ती समाजातील बंधुभावाला धक्का देणारी आहे. जातीजातीत महापुरुष वाटून घेतले जाणे ही अतिशय चिंताजनक बाब आहे. त्यामुळे ही परिस्थिती आपण सर्वांनी मिळून नाहीशी करून समाजात पुन्हा एकदा खरी समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी केले. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे शनिवार (दि.६) रोजी महाराष्ट्र आधार सेना, दैनिक महाराष्ट्र आरंभ आणि सत्यशोधक प्रतिष्ठान यांच्या वतीने पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सत्यशोधक पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी धनंजय मुंडे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. मुंडे पुढे म्हणाले की, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्ताने होणारा हा सोहळा ▶▶ उर्वरित पान २ वर

## अनंत चतुर्दशी : गणेश विसर्जन सोहळ्यात परदेशी पर्यटकांनी अनुभवली महाराष्ट्राच्या संस्कृतीची जादू

### मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी केली बाप्पाची आरती..!

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गिरगांव चौपाटी येथील बृहन्मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाने संयुक्तपणे उभारलेल्या विशेष दालनाला भेट देत विसर्जन



होत असलेल्या बाप्पाची आरती केली. यावेळी परदेशी पर्यटकांनी गणरायाच्या विसर्जन मिरवणुकीचा थक्क करणारा अनुभव घेतला. तर, थायलंड येथून हा विसर्जन सोहळा अनुभवण्यास आलेल्या पर्यटकांनी आरतीतही सहभाग घेतला.

▶▶ उर्वरित पान २ वर

### बीड जिल्ह्यात गणेश विसर्जन शांततेत


**बीड । प्रतिनिधी**

दहा दिवसांच्या उत्साहानंतर काल गणेश विसर्जन झाले. शहरामध्ये मोठ्या उत्साहात श्रीला निरोप देण्यात आला. उत्सवा दरम्यान कुठलाही अनुचीत प्रकार घडू नये म्हणून शहरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यंदाच्या गणेशोत्सवामध्ये डीजेवर ▶▶ उर्वरित पान २ वर

## वैद्यकीय अधिकाऱ्याची तलावात उडी घेऊन आत्महत्या

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील चिखलबीड ग्रामपंचायत अंतर्गत असणाऱ्या देठेवाडी तलावात एक मृतदेह तरंगताना आढळून आल्याने खळबळ उडाली होती पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत मृतदेह तलावाच्या बाहेर काढला असता



ओळख पटली असून वडवणी प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असणारे डॉ. शुभम यादव यांचा मृतदेह असल्याची ओळख पटली आहे. वडवणी प्राथमिक अआरोग्य केंद्रात कार्यरत असणारे डॉ. शुभम बालकनाथ यादव (रा. देवळा

▶▶ उर्वरित पान २ वर

## हायड्रोलिक लिफ्ट, कंट्रोल रूम, स्प्रिंकलर.; तरीही लालबागच्या राजाचं विसर्जन रखडलं

### कोट्यवधी खर्चून गुजरातचा 'हायटेक तराफा' फुस्का!

**मुंबई । प्रतिनिधी**

नवसाला पावणारा राजा,, लाखो भाविकांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू, लालबागचा राजा यंदा विसर्जनासाठी गिरगाव चौपाटीवर दाखल झाला. मात्र विसर्जनाचा सोहळा सुरळीत पार पडेल या अपेक्षांना मोठा धक्का बसला. कारण राजाच्या विसर्जनासाठी कोट्यवधी रुपये खर्चून गुजरातमध्ये खास तयार केलेला हायटेक तराफा समुद्रात उतरल्यावर फसका ठरला. यानंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचा महासागर असलेल्या लालबागच्या राजाच्या विसर्जनात यंदा 'हायटेक तराफा' नावाचा प्रायोगिक शो घडवण्यात आला होता. गुजरातमध्ये खास तयार केलेला हा कोट्यवधी रुपयांचा तराफा म्हणजे श्रद्धेला




तंत्रज्ञानाची जोड, सुरक्षित आणि आकर्षक विसर्जनाची हमी असा गाजावाजा करण्यात आला. पण प्रत्यक्षात हा प्रयोग लालबागच्या राजाच्या विसर्जनाच्या वेळेस फेल ठरला आणि 'हायटेक तराफा' भाविकांसाठी अडचणींचा डोंगर ठरला. राजाचे विसर्जन अधिक सुरक्षित आणि आकर्षक करण्यासाठी हा तराफा तयार करण्यात आला होता. साध्या बोटीऐवजी हा आधुनिक तराफा हायड्रोलिक लिफ्ट, स्वयंचलित नियंत्रण प्रणाली, समुद्रातील प्रवाहानुसार स्थिर राहण्याची क्षमता, ३६० अंशात पाण्याचे फवारे उडवणारे स्प्रिंकलर आणि खास कंट्रोल रूम अशा डझनभर वैशिष्ट्यांनी सज्ज होता. एवढंच नाही तर हा तराफा इतका मोठा होता की ▶ उर्वरित पान २ वर

### आज ईद-ए मिलादुन्नबी जुलूस : जहिर कादरी

**बीड । प्रतिनिधी**

५ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलादुन्नबी आहे. दोन सण लागोपाठ आले होते प्रशासनाच्या विनंतीवरून ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त काढण्यात येणारा जुलूस (मिरवणूक) तीन दिवस पुढे ढकलण्यात आला होता उद्या सोमवारी (दि.८) दुपारी १ वाजता मिरवणूक काढण्यात येणार असल्याची माहिती केजीएन ग्रुपचे अध्यक्ष जहीर कादरी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.




# शिलाहार ते मराठा राजधानीचे बळकट स्थान 'पन्हाळा'

वारणा आणि पंचगंगेची उपनदी असलेल्या कासारी नदीचा जलविभाजक असलेल्या सह्याद्रीच्या पूर्व दिशेने पसरलेल्या रांगेच्या उंच डोंगर पर्नाल पर्वत म्हणजेच पन्हाळा. पन्हाळा हा पावनगड आणि पन्हाळा असा जोड किल्ला आहे. समोरच दख्खनचा राजा म्हणून ओळखला जाणार जोतिबाचा डोंगर याच रांगेत आहे. ईशान्येला पसरलेलं वारणेचे विस्तीर्ण खोरे, पूर्व आणि दक्षिणेकडे पंचगंगा आणि कासारीचे खोरे आणि कोल्हापूर परिसर तर पश्चिमकडे विशाळगडपर्यंतचा संपूर्ण परिसर.

शिलाहार राजा भोज यांनी बांधलेल्या किल्ल्यांपैकी एक महत्त्वाचा किल्ला म्हणजे पन्हाळा. शिलाहारांच्या कोल्हापूर घराण्याच्या राजधानीचा मान या किल्ल्याकडेच होता. या किल्ल्याच्या वास्तूरचनेतून शिलाहार कालीन वास्तू निर्मिती कशा प्रकारे होती हे दिसून येते. वाघ दरवाजा येथे असलेले मयुर आणि गरुडाचे चिन्ह हे या गडाचे प्राचिनत्व सिद्ध करते. कोकण आणि दख्खनचे पठार यांना जोडणारा महत्वाचा व्यापारी मार्ग प्राचिन काळापासून प्रचलित आहे. अनुस्कुरा घाट आणि आंबा घाट मार्गे होणाऱ्या व्यापारावर नियंत्रण ठेवणे आणि संरक्षणाच्या दृष्टीने पर्नाल पर्वत हे ठिकाण मोक्याचे व महत्वाचे असल्याचे जाणून शिलाहार राजा भोज याने पन्हाळा किल्ला बांधला आणि त्याला आपल्या राजधानीचे स्थान बनवले.

असा हा प्राचीन पन्हाळा शिलाहारांनतर यादव आणि त्यानंतर बहमनी, आदिलशाही अशा सत्ताधिशांच्या अंमलाखाली राहिला. प्रतापगडच्या युद्धानंतर आदिलशाहीमध्ये निर्माण झालेल्या गोंधळाचा फायदा घेत छत्रपती शिवाजी महाराजांनी कोल्हापूर पर्यंतचा आदिलशाही मुलूख जिंकला. त्याचवेळी १६५९ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी पन्हाळा किल्लाही जिंकुन घेतला. त्यानंतर पन्हाळा किल्ल्याला आणखी मजबूत करण्याच्या दृष्टीने त्याच्या समोरच लागून असलेल्या डोंगरावर अर्जोजी यादव यांच्या देखरेखीखाली पावनगड उभारण्यात आला. यामुळे पन्हाळा आणखी भक्कम व भव्य झाला. या किल्ल्यासोबत छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज आणि महाराणी ताराराणी यांच्या जीवनातील अनेक महत्त्वाच्या घटना जोडलेल्या आहेत. मराठा इतिहासापुरता विचार करता स्वराज्यातील अनेक महत्वाच्या लढायांचा आणि प्रसंगांचा मुक साक्षीदार आहे पन्हाळा.



सिद्दी जोहरचा वेढा आणि पावनखिंडची लढाई– १६५९ मध्ये कोल्हापूर, पन्हाळा सोबतच दक्षिण कोकणचा प्रांत छत्रपती शिवाजी महाराजांनी जिंकल्यानंतर आदिलशाही दरबारामध्ये एकच गोंधळ उडाला. अशा वेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी आदिलशाही दरबाराने सिद्दी जोहर या सेनापतीची नेमणूक केली. सिद्दी हा अफजल खानाइतकाच क्रूर आणि धूर्त होता. त्याने मराठ्यांसोबत युद्ध पुकारून मिरज मार्गे कोल्हापूर प्रांतावर हल्ला केला. त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांनी लढाईच्या तयारीने पन्हाळा सज्ज केला. सिद्दी जोहरने पन्हाळा गडाला कडक वेढा घातला आणि छत्रपती शिवाजी महाराजांना कैद करण्याची योजना आखली. भर पावसातही वेढ्याचे काम जोराने चालवले. त्यामुळे गडावरील अन्न–धान्य व युद्ध साहित्य कमी होत चालले. या सर्वांचा विचार करून छत्रपती शिवाजी महाराजांनी वेढा फोडून निसटण्याचा बेत आखला. त्यासाठी त्यांनी शिवा काशिद या मावळ्याला वेशांतर करून सिद्दीच्या भेटीस पाठवले आणि आपण स्वतः वाघ दरवाजा उतरून विशाळगडच्या दिशेने कुच केले. शत्रूने मराठा सैन्याचा पाठलाग करण्यास सुरुवात केली. त्यावेळी छत्रपतींसोबत रायाजी बांदल आणि त्यांचे सैन्य, शंभुसिंह जाधव, बाजी प्रभू व फुलाजी प्रभू देशपांडे असे कसलेले योद्धे होते. त्यांनी महाराजांना सांगितले की त्यांनी विशाळगड जवळ करावा आणि आम्ही खिंडीत शत्रुला अडवून धरतो. यानुसार रायाजी बांदल आणि त्यांचे सैन्य, शंभुसिंह जाधव, बाजी प्रभू व फुलाजी प्रभू देशपांडे यांनी घोड खिंड (पावन खिंड) येथे सिद्दीच्या सैन्याला रोखून धरले. या खिंडीत झालेल्या लढाईमध्ये दुर्दैवाने हे सर्व वीर धारातिर्थी पडले. त्याचे स्मारक आजही आपल्याला पांढरे पाणी (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथे पहावयास मिळते.

पन्हाळा पुन्हा स्वराज्यात– सिद्दीच्या वेढ्यानंतर पन्हाळा पुन्हा आदिलशाहीकडे गेला. त्यामुळे कोल्हापूर प्रांतावरील मराठ्यांचे वर्चस्व धोक्यात आले. तसेच राजापूर बंदरातील व्यापारावरही त्याचा परिणाम झाला. त्यामुळे पन्हाळा पुन्हा स्वराज्यात आणण्याचा प्रयत्न छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरू केला. १६७४ मध्ये हिरोजी फर्जंद या सेनापतीने अवघ्या ६० मावळ्यांनिशी रात्रीचा छापा टाकून पन्हाळा जिंकून घेतला आणि पन्हाळा पुन्हा स्वराज्यात समील झाला.

औरंगजेबाची स्वारी आणि मराठ्यांची चिवट झुंज– छत्रपती संभाजी महाराज यांनी औरंगजेबास कडवी झुंज देऊन स्वराज्याचे रक्षण केले. त्यानंतर छत्रपती राजाराम महाराज यांच्या नेतृत्वात मराठ्यांनी लढा सुरूच ठेवला. जिंजीहून आल्यानंतर छत्रपती राजाराम महाराज यांनी पन्हाळा ही राजधानी करून काहीकाळ येथूनच कारभार चालवला. यानंतर सन १७०० मध्ये राजाराम महाराज यांचा मृत्यू झाल्यानंतर महाराणी ताराराणी यांनी लढा सुरू ठेवला. महाराणी ताराराणी यांच्या नेतृत्वात मराठा सरदारांनी मुघलांना चिवट झुंझ दिली.

मराठ्यांची राजधानी पन्हाळा– महाराणी ताराराणी यांनी पन्हाळा येथे राजधानी घोषीत करून कोल्हापूर संस्थांनची स्थापना केली. यानंतर अनेक वर्ष कोल्हापूर संस्थानचा कारभार पन्हाळा किल्ल्यावरून चालत होता. याची साक्ष म्हणजे पन्हाळा किल्ल्यावर असलेले कचेरीचे वाडे.

पन्हाळा हा किल्ला बांधताना दीर्घकालीन लढाईसाठी सुसज्ज असा किल्ला उभारण्यात आला होता. समुद्रसपाटीपासून तब्बल ८४५ मीटर उंचीवर, आणि ७ चौरस किलोमीटरच्या अफाट विस्तारावर उभा असलेला हा किल्ला, महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या किल्ल्यांपैकी एक आहे. पन्हाळा व पावनगड हे दोन्ही जोडकिल्ले खोल दरीच्या साहाय्याने एकमेकांशी जोडलेले आहेत. शिवकालीन लष्करी दृष्टिकोनातून या दोन किल्ल्यांची सांगड ही एक अपूर्व अशी संरक्षणयंत्रणा होती.

रचना आणि वैशिष्ट्ये– किल्ल्याच्या मध्यभागी बालेकिल्ला असून तो पूर्वीच्या काळी मुख्य केंद्रबिंदू होता. आजही त्याची मजबूत तटबंदी अभिमानाने उभी आहे. याच आवारात तीन प्रचंड धान्यकोठारे आहेत. त्यापैकी दोन बहामनी काळात बांधले गेलेले, तर तिसरे काळ्या दगडात बांधलेले कोठार मराठाकालीन आहे. या धान्यकोठाऱ्यांमुळे किल्ला दीर्घकाळ शत्रूच्या वेढ्यात टिकून राहू शकत असे. संपूर्ण डोंगराभोवती पसरलेली पन्हाळ्याची भव्य तटबंदी नागमोडी वळणे घेत डोंगरशिखरांवरून पुढे सरकते. त्यामध्ये अनेक गुप्त दरवाजे व मार्ग लपलेले आहेत. तीन दरवाजा, वाघ दरवाजा, चार दरवाजा असे भव्य दरवाजे या किल्ल्याला आहेत. पैकी चार दरावाजा अस्तित्वात नाही. त्याशिवाय आंधार बाव ही बारमाही विहीर या किल्ल्यात आहे. वास्तू रचनेचा अनोखा अविष्कार या ठिकाणी दिसून येतो. तीन दरवाजाच्या वरती श्री. गजाननाचे शिल्प कोरलेले आहे. तर वाघ दरवाजातून खाली जात असताना डाव्या हातास पद्म, मयूर व वरती असलेले गरूड शिल्प हा किल्ला प्राचीन असल्याची साक्ष देत आहे. तटबंदीवर तब्बल ४० हून अधिक बुरुज उभे आहेत. त्यांपैकी काळा बुरुज आणि पुसाटी बुरुज हे विशेष उल्लेखनीय आहेत. मराठ्यांनी हे बुरुज अधिक मजबूत केले, तसेच तोफांसाठी उंच दमदमे उभारले. पन्हाळा हा फक्त लष्करी किल्ला नव्हता. त्याच्या आवारात आजही भव्य राजवाडे, मंदिरे आणि प्रशासकीय इमारतींचे अवशेष दिसतात. अंबारखाना, राजमाता ताराराणींचा राजवाडा आणि विशाल धान्यकोठारे हे त्या काळातील मराठ्यांच्या दूरदृष्टीचे आणि वास्तुकलेचे द्योतक आहेत. या इमारतींमधूनच किल्ल्याचे प्रशासन चालत असे.

– संजय डी.ओरके
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई.

◆ पान १ वरून पुढे...

## पालकमंत्री अजितदादांकडून...

तातडीने हस्तक्षेप करून बालाघाट डोंगररांगा वाचवाव्यात, अशी मागणी केली आहे. दरम्यान, जिल्ह्यातील अवैध गौण खनिज उपसा आणि वाहतुकीत महसूल व पोलीस अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांचीच वाहने गुंतलेली असल्याची चर्चा जनतेत आहे. यामुळे जिल्ह्यातील जंगल, झाडे, डोंगररांगा नामशेष होण्याच्या मार्गावर असून भूजल पातळी झपाट्याने खाली जात आहे, मातीची धूप वाढली आहे आणि भविष्यात संपूर्ण बीड जिल्हा ओसाड होण्याची शक्यता असल्याची गंभीर चिंता पर्यावरण प्रेमींनी व्यक्त केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील मुरुम उपसा प्रकरणात धाडसी कारवाई करणाऱ्या अंजना कृष्णा (सहाय्यक पोलीस अधीक्षक) यांना मिळालेल्या धमक्या पाहता बीडमधील प्रशासनाकडून कारवाईची अपेक्षा ठेवणे अवास्तव आहे. त्यामुळेच बालाघाटाच्या डोंगररांगांच्या रक्षणासाठी पंकजाताई मुंडेंनी पुढाकार घ्यावा, अन्यथा जिल्ह्याचे पर्यावरणीय संतुलन धोक्यात येईल, असे आवाहन डॉ. गणेश ढवळे यांनी केले आहे.

## गणपती विसर्जनादरम्यान....

प्रामुख्याने पुणे आणि मुंबईमध्ये गणपती विसर्जनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असते. मात्र, याच विसर्जनादरम्यान राज्यात विविध घटनांमध्ये ५ व्यक्तींचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तसेच ११ व्यक्तींचा शोध सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाकडून एनडीआरएफ आणि एसडीआरएफ यांना आपत्कालीन परिस्थितीकरता सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत..

## जातीवाद संपवून...

परिवर्तन घडवणारा आहे. अण्णाभाऊंना भारतरत्न मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. समाजाच्या इतरही मागण्यांसाठी आपण नेहमीच ठामपणे लढा देणार आहोत. घरकुल, गायरान यांसारख्या जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांसाठी लोकप्रतिनिधी म्हणून आवाज उठविण्यात आपण कधीही मागे हटणार नाही. गेल्या १७ वर्षांपासून समाजासाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्याचे काम दीपक थोरात यांनी केले. त्याबद्दल मुंडे म्हणाले की, सत्यशोधक पुरस्कार हा कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारा आहे. ज्यांना हा सन्मान मिळतो त्यांना नव्या उर्जेचा संचार होतो. दीपक थोरात यांनी एक शिस्तप्रिय कार्यकर्ता म्हणून सुरुवात करून आज यशस्वी संपादक म्हणून लौकिक मिळवला आहे. त्यांच्या अथक

◆ पान १ वरून पुढे...

परिश्रमांतून आणि संघर्षातून प्रेरणा घेण्यासारखे आहे. सामान्य कुटुंबातून पुढे येऊन त्यांनी गाठलेले यश हे खऱ्या अर्थाने समाजासाठी आदर्श आहे. त्यांच्या पाठीशी आपण ठामपणे उभे आहोत. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार विजेत्यांचा सत्कार करताना सभागृहात उत्साहाचे वातावरण होते. समाजाच्या प्रश्नांवर आणि समतेच्या मूल्यांवर भर देणारे मुंडे यांचे विचार उपस्थितांवर ठसा उमटवणारे ठरले. यावेळी पत्रकारिता क्षेत्रातील महामेरू लोकप्रभाचे संपादक संतोष मानुरकर, उत्कृष्ट उपसंपादक उत्तम हजारे, दैनिक पुण्यभूमीचे सुनील डोंगरे, प्रजापत्राचे बाबुराव झेंडे, उत्कृष्ट फोटोग्राफर कृष्णा शिंदे, ज्ञानेश्वर वायबसे सह शैक्षणिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य असणाऱ्या सीमा ओस्तवाल, सिने वनवा नावाचा चित्रपट अभिनेत्री श्रुती सह अभिनेता पत्रकार बाळासाहेब आडागळे सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब सोनटक्के, उत्कृष्ट रक्तदान शिबिर बबलू शिंदे तुषार लोंढे उत्कृष्ट अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती बाबासाहेब कांबळे दिंद्रुड व रामतीर्थ येथील मसूर पवार यांनी उत्कृष्ट जयंती काढल्याबद्दल त्यांचाही या ठिकाणी सन्मान करण्यात आला यावेळी राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच महाराष्ट्र आधार सेना संस्थापक अध्यक्ष, सायं. महाराष्ट्र आरंभाचे संपादक दीपक थोरात, उद्धव आरे अशोक वाघमारे सह सर्व पदाधिकारी उपस्थित होते

## बीड जिल्ह्यात ...

प्रशासनाने बंदी घातली होती. त्यामुळे पारंपारिक पद्धतीचे वाद्य लावून श्रींची मिरवणूक काढण्यात आली. काही गणेशाचे सकाळी तर काहींचे सायंकाळी विसर्जन करण्यात आले. रात्री बारा वाजेपरत विसर्जनाला परवानगी देण्यात आली होती. जिल्ह्यात शांततेमध्ये गणेश विसर्जन पार पडले.

## अनंत चतुर्दशी :....

याप्रसंगी, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका आणि पर्यटन विभागाने केलेल्या आयोजनाचे कौतुक केले. अनंत चतुर्दशीनिमित्त मुंबईतील ऐतिहासिक गिरगाव चौपाटीवर आयोजित गणेश विसर्जनाच्या भव्य सोहळ्याने परदेशी पर्यटकांना मंत्रमुग्ध केले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा हा अनमोल ठेवा त्यांनी आपल्या हृदयात आणि कॅमेऱ्यात कायमस्वरूपी जतन केला. गणेश विसर्जनाचा हा भव्य सोहळा 'याचि देही याचि डोळा पाहण्यासाठी' मॉरिशस, कोरिया, अमेरिका, थायलंड, जपान आणि दक्षिण आफ्रिका येथून आलेल्या

◆ पान १ वरून पुढे...

पर्यटकांनी उपस्थिती दर्शविली होती. या सोहळ्याच्या निमित्ताने आलेल्या पर्यटकांना केवळ मिरवणुकीच्या भव्यतेचे दर्शनच घेता आले नाही, तर त्यांना गणरायाची श्रद्धेने पूजा करणे, आरतीत सहभागी होणे आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात सामील होण्याची संधी मिळाली. पारंपरिक महाराष्ट्रीय वेशभूषेत सज्ज होऊन, ढोल–ताशांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात हे पर्यटक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक श्रीमंतीत तल्लीन झाले. या सोहळ्याला पर्यटन संचालनालयाचे संचालक डॉ बी. एन. पाटील, पर्यटन विभागाचे उपसचिव संतोष रोकडे उपस्थित होते. परदेशी पर्यटकांच्या मनात रुजली महाराष्ट्राची संस्कृती– या उत्सवाचे साक्षीदार ठरलेल्या एका परदेशी पर्यटकाने आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, हा सोहळा म्हणजे केवळ उत्सव नाही, तर श्रद्धा, एकता आणि आनंदाचा संगम आहे. लाखो लोक एकाच स्वरात 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष करताना पाहून माझे मन थक्क झाले. अंगावर रोमांच उभे राहिले आणि डोळ्यात आनंदाश्रू तरळले. भारतात येऊन हा अनुभव घेणे म्हणजे माझ्यासाठी स्वप्नवत आहे. अनेक पर्यटकांनी गणरायाच्या मनमोहक मूर्तींसोबत छायाचित्रे काढली आणि या अविस्मरणीय क्षणांना आपल्या कॅमेऱ्यात बंदिस्त केले. महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या अधिकारी–कर्मचाऱ्यांनी या पर्यटकांना गणेशोत्सवाची ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महती समजावून सांगितली. महाराष्ट्राच्या पर्यटनाला नवी उभारी मिळेल – पर्यटनमंत्री शंभुराज देसाई : गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारस्याचा अविभाज्य भाग आहे. परदेशी पर्यटकांना या उत्सवात सहभागी करून घेणे, हा आपल्या परंपरांचा जागतिक पातळीवर प्रसार करण्याचा एक सशक्त प्रयत्न आहे. यामुळे महाराष्ट्राच्या पर्यटनाला नवी उभारी मिळेल आणि आपल्या सांस्कृतिक वैभवाची ख्याती जगभरात पोहोचेल, असे पर्यटन मंत्री शंभुराज देसाई यांनी म्हटले आहे. तर, आम्ही पर्यटकांसाठी एक असे व्यासपीठ निर्माण केले, जिथे ते या उत्सवाचा थेट अनुभव घेऊ शकले. अशा उपक्रमांमुळे महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक दृढ होईल, असे पर्यटन विभागाचे प्रधान सचिव डॉ.अतुल पाटणे यांनी म्हटले आहे. पर्यटन संचालक डॉ.बी.एन.पाटील म्हणाले, आमच्या विशेष दालनामुळे पर्यटकांना केवळ मिरवणूक पाहण्याचीच संधी मिळाली नाही, तर ते गणेशोत्सवाच्या खऱ्या भावनेशी जोडले गेले. त्यांनी दाखवलेला उत्साह आणि प्रेम पाहून आम्ही प्रेरित झालो आहोत. ढोल–ताशांच्या गजरात, भक्तिमय वातावरणात आणि गणरायाच्या निरोपाच्या हृदयस्पर्शी क्षणात सहभागी होऊन या पर्यटकांनी महाराष्ट्राच्या आतिथ्यशील संस्कृतीचा अनुभव घेतला. हा अनुभव त्यांच्या मनात आयुष्यभर कोरला जाईल.

◆ पान १ वरून पुढे...

## वैद्यकीय अधिकाऱ्याची...

ता.अंबाजोगाई) हल्ली मुक्काम बीड हे एक दिवसापासून बेपत्ता होते. बेपत्ता असल्याची तक्रार डॉ.यादव यांचे वडील बालकनाथ यादव यांनी बेपत्ता असल्याची तक्रार पोलीस ठाण्यात दाखल केली होती.काल सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास देटेवाडी तलावात डॉ.शुभम बालकनाथ यादव यांचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. मानसिक ताणवाखाली येऊन आत्महत्याचे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे. ही घटना शनिवार दि. ६ सप्टेंबर रोजी रात्री ५ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. सदरील या घटनेने वडवणी तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. आत्महत्या का केली ? कशामुळे केली ? याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. वडवणी पोलीसांनी घटनास्थळी दाखल होत पंचनामा करून मृतदेह बीड जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास वडवणी पोलीस करत आहेत. गेल्या पंधरा दिवसात वडवणी तालुक्यातील दोन अधिकाऱ्यांनी आत्महत्या केल्याने अधिकारी वर्गात खळबळ उडाली आहे.

## हायड्रोलिक लिफ्ट....

समुद्रात जाण्यासाठी कोणत्याही दुसऱ्या बोटीची गरज नव्हती. पण या तराफ्यावर मूर्ती योग्य प्रकारे बसलीच नाही! मूर्ती चढवताना संतुलन बिघडले. ज्यामुळे विसर्जन थांबवावे लागले. परिणामी, कोट्यवधी रुपये खर्चून आणलेला तंत्रज्ञानाचा तमाशा प्रत्यक्षात भाविकांसाठी डोकेदुखी ठरला. गुजरातमध्ये बनवलेल्या या तराफ्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले. पण प्रत्यक्षात मूर्तीच सुरक्षितपणे बसली नाही तर एवढ्या खर्चाचा उपयोग काय? विसर्जनाचा सोहळा अधिक आकर्षक दिसेल, असा उद्देश होता. मात्र काही वेगळेच घडल्याचे दिसून आले आहे. हा तराफा पूर्वीच्या तराफ्यापेक्षा दुप्पट मोठा होता. तसेच स्वयंचलित होता. तराफ्यावर एक विशेष कंट्रोल रूम आहे. जिथून कॅप्टन आणि तंत्रज्ञ प्रत्येक गोष्टीवर लक्ष ठेवतो. कॅप्टन तराफ्याचे संतुलन आणि वेगावर नियंत्रण करतो. मात्र तराफा बाप्पाच्या उंचीपेक्षा उंच असल्याचे दिसून आले आहे. यामुळे मोठी अडचण निर्माण झाली आहे. सकाळी आठ वाजल्यापासून गिरगाव चौपाटीवर लालबागचा राजा ताटकळत आहे. भाविक बाप्पाच्या विसर्जनाची वाट पाहत आहेत. समुद्रातील भरतीमुळेही विसर्जनाला उशीर झाला आहे. आता संध्याकाळी ६ नंतरच राजाचे विसर्जन होणार असल्याचे समोर आले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## सिंदफणात पाणी,....

नदीपात्रात सोडावे व राष्ट्रीय महामार्ग लगत उपकालवा करावा यासाठी सर्वे करणे गरजेचे असल्याचे पत्र अधीक्षक अभियंता लाभक्षेत्र विकास बीड यांनी मुख्य अधीक्षक अभियंता संभाजीनगर यांना गेल्या तीन महिन्यापूर्वी पाठविलेले आहे. गेल्या तीन महिन्यापासून लोकलढा आंदोलनाचे समन्वयक सातत्याने पाठपुरावा करत असले तरी या योजनेसाठी सर्वे करावा यासाठी प्रशासन पाहिजे तशी दखल घेत नव्हते. त्यामुळे रविवारी लोकलढा आंदोलनाच्या समन्वयकांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची प्रवारानगर येथे भेट घेत चर्चा केली व त्यांना निवेदन सादर केले. यावेळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी छत्रपती संभाजीनगर येथील जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी व जलसंपदा विभागातील इतर मुंबई स्थित अधिकारी यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संवाद साधला. तसेच सिंदफणा उपसा सिंचन योजना व उप कालवा या दोन्हींसाठी सर्वे करावा या संदर्भात अधिकाऱ्यांना लेखी सूचनाही केल्या.

◆ पान ४ वरून पुढे...

## बोरगाव अंजनपूर...

मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत. शासनाचा हा निर्णय जाहीर झाल्यानंतर आ. नमिता मुंदडा यांनी सांगितले की, हा प्रकल्प हाच माझ्या मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी जीवनरेखा आहे. गेल्या काही वर्षांपासून मी यासाठी सतत प्रयत्न करत होते. अखेर सरकारने मान्यता दिल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. ही मंजुरी मिळाल्याने या भागातील शेतकऱ्यांत समाधानाचे वातावरण आहे....

## स्वराज्य जनजागृती...

सप्टेंबर रोजी हा मेळावा बीड येथील समर्थ मंगल कार्यालय, नगर रोड, बीड या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. केवळ जिल्हास्तरावर नव्हे तर विभाग स्तरावर हा मेळावा आयोजित करण्यात आला असून या मेळाव्याला सर्व सक्रिय कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मेळाव्याला सुरुवात सकाळी अकरा वाजता होईल. मेळाव्याला परिषदेचे उपाध्यक्ष संदीप जगताप सातारा, यांच्यासह कोषाध्यक्ष शिवाजी खेडकर पुणे, विश्वस्त विष्णू ढवळे छत्रपती संभाजीनगर, विश्वस्त अरुण बोबडे धाराशिव, यांच्यासह तुषार पाटील कुर्ला आणि गोवर्धन मस्के बीड यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. शासन आणि प्रशासन भरकटत चालले आहे. सामान्य जनतेची कामे नियमाप्रमाणे वेळेत होत नाहीत. त्यामुळे अशा प्रसंगी प्रश्न विचारणारी जनता तयार करण्यासाठी परिषद काम करणार आहे. लोकशिक्षण आणि लोकजागृती शिवाय आता पर्याय नसल्याने लोकांना आपले प्रश्न घेऊन स्वतः उभे राहता यावे, यासाठी हा लढा असेल. आमच्याशी संपर्कात असलेल्या सर्व जुन्या कार्यकर्त्यांसह नवीन कार्यकर्त्यांनी देखील यात सहभाग नोंदवायचा आहे. त्यामुळे जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे काम करण्याच्या उद्देशाने या मेळाव्याला उपस्थित राहावे. या मेळाव्यात पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांसह मराठवाड्यात जिल्हा निहाय दौऱ्याबाबतचे नियोजन देखील करण्यात येणार आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन ड. देशमुख यांनी केले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## 'घरकुल'चे नवीन...

सोननर पण उपस्थित होते. न.प.मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी शिष्टमंडळास रमाई घरकुल योजनेचे हप्ते तात्काळ वाटप करण्याचे आश्वासन दिले आहे.

## मराठा समाजाची...

हे कॅव्हेट दाखल झाल्याची माहिती गंगाधर काळकुटे यांनी दिली आहे. हैदराबाद गॅझेटमुळं कोणत्याही समाजाला धोका नाही. हे न्यायालयात सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयात काही जणांकडून जीआर विरोधात याचिका दाखल केल्याची काळकुटे यांनी माहिती दिली आहे. राज्य सरकारने मराठा आरक्षणाचा तिढा सोडवला मात्र काही जणांकडून याला विरोध केला जात आहे. त्यामुळं हे कॅव्हेट असल्याची माहिती गंगाधर काळकुटे यांनी दिली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## शिरूर शहरात महिलांनी स्थापन केलेल्या लाडक्या बाप्पाचं वाजत गाजत विसर्जन



शिरूर । प्रतिनिधी

राज्याचे आराध्य दैवत असलेल्या गणरायाचे दहा दिवस विधिवत पूजन केल्यानंतर अनंत चतुर्थीच्या दिवशी गणरायाला उत्साहात निरोप देण्यात आला. शहरातील प्रभाग क्रमांक चौदा मध्ये महिलांनी एकत्र येऊन स्थापना केलेल्या गणरायाला उत्साहात निरोप देण्यात आला.या वेळी उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.महिलांनी पारंपारिक नृत्य सादर करत मनसोक्त लेझीम ,फुगडी खेळत गणरायाची भव्य सवाद्य मिरवणूक काढली.यावेळी महिला गणेश मंडळाच्या पदाधिकारी मनिषा आतकरे, मंगल खेडकर, अश्विनी ढाकणे, संगीता खेडकर, मीना खेडकर ,सुनिता खेडकर, सुनिता वारे, प्रीती सानप, प्रगती सानप ,शितल ढाकणे ,भारती काळे, मयुरी जरांगे, ज्ञानेश्वरी जरांगे, जयश्री आमले, सरिता चव्हाण, सुवर्णा सूर्यवंशी, ऋतुजा मिसाळ, निकिता खरात, पाखरे यांच्यासहित महिला मंडळांनी महिला गणेश मंडळ स्थापन करून अनंत चतुर्दशी दिवशी लाडक्या बाप्पाचं वाजत गाजत निरोप दिला यावेळी मोठ्या संख्येने महिला व बाल गोपाळ उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी यांनी 'विवेक' जागा ठेवून 'हरित बीड अभियान'ला खोडा घालत...

# वृक्षतोड करणा-या जिल्हा कारागृह अधीक्षकावर कारवाई करा

**● आज जिल्हा कारागृहासमोर आंदोलन : डॉ.गणेश ढवळे**





बीड । प्रतिनिधी

हरित महाराष्ट्रच्या धर्तीवर बीड जिल्हा प्रशासनाने नुकतेच हरित बीड अभियान राबवून पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत एका दिवसात तब्बल ३० लाख वृक्ष लागवडीचा इव्हेंट करून इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये नोंद केली. या वेळी पालकमंत्री पवार यांनी सत्कारही स्वीकारला. मात्र, यातल्या तब्बल ७ लाख नरेगा अंतर्गत जिल्हा रेशीम कोष कार्यक्रमातील तुती चा समावेश वृक्ष लागवडीत करण्यात आला आहे. बीड जिल्हा कारागृहात करण्यात आलेल्या वृक्षतोड संदर्भात संबंधितांवर कारवाई करण्यासाठी ऊद्या सोमवार रोजी जिल्हा कारागृहासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिला आहे.

याच दरम्यान, जिल्हा कारागृह परिसरातील मोठमोठ्या वृक्षांची अवैध तोड करण्यात आल्याचे समोर आले असून, तब्बल दोन ट्रक भरून लाकूड सामाजिक कार्यकर्ते व वृक्षप्रेमींनी पोलिस प्रशासनाकडे जमा केले आहे. या प्रकरणात जिल्हा कारागृह अधीक्षकांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी डॉ.गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी पालकमंत्री अजितदादा पवार, पर्यावरणमंत्री पंकजाताई मुंडे, जिल्हाधिकारी बीड व पोलीस अधीक्षक बीड यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

डॉ. ढवळे यांनी सांगितले की, एक पेड मां के नाम या केंद्र सरकारच्या उपक्रमाअंतर्गत प्रत्येक शासकीय कार्यालयात वृक्षलागवड करणे अनिवार्य आहे. मात्र, याउलट शासकीय कार्यालयातच वृक्षतोड होत असेल तर हे दुर्दैव आणि गंभीर आहे. बीड जिल्ह्यात जंगल क्षेत्राची घनता केवळ २.५ टक्के असून पर्यावरण संतुलनासाठी आवश्यक असलेली ३३ टक्के घनता गाठणे दूरचे स्वप्न ठरत आहे.

याच निषेधार्थ (सोमवार) जिल्हा कारागृह कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार असून प्रशासनाने तातडीने संबंधितांवर कारवाई न केल्यास आंदोलन उग्र होईल, असा इशारा डॉ.गणेश ढवळे यांनी दिला आहे.

## कायदेशीर रित्या जन्म प्रमाणपत्र घेणे गुन्हा आहे का? गेवराईचे लोकप्रतिनिधी याबाबतीत मुंग गिळून गप्प कसे?

**गेवराई पोलिसांची मनमानी, नागरिकांची छळवणूक–स्थानिक नेते नागरिकांना दिलासा कधी देणार ?**

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील जनतेने आधार कार्ड, पॅन कार्ड, पासपोर्ट यासारख्या कागदपत्रांमधील जन्म तारखेच्या चुका दुरुस्ती करण्यासाठी किंवा पासपोर्ट काढण्यासाठी तहसील कार्यालया मधून रीतसर जन्म दाखले मिळवले परंतु भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या तक्रारी नंतर तहसीलदार संदीप खोमणे यांनी सखोल तपास न करता थेट १७ नागरिकांवर गुन्हा दाखल केला आहे. एवढेच नाही तर त्यांनी सर्व ११३४ अर्ज पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. गेवराई तहसीलदार संदीप खोमणे यांनी कोणतीही चौकशी समिती न बनवता व कायदेशीर प्रक्रियेकडे दुर्लक्ष करून सर्वसामान्य नागरिकांवर गुन्हे दाखल केले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे प्रचंड हाल होत असून तहसीलदार व

त्यांच्याशी गैरवर्तन करणे हे प्रशासनाचे निंदनीय कृत्य आहे. ही केवळ प्रशासकीय मनमानीच नाही तर सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे ही उल्लंघन आहे. तसेच थेट हल्ला पण आहे. या संपूर्ण प्रकरणावर गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, युवानेते बाळराजे पवार यांनी तातडीने हस्तक्षेप करून नागरिकांना दिलासा देण्याची मागणी होत आहे. जन्म प्रमाणपत्र हा आधार पॅन किंवा पासपोर्ट मधील चुका सुधारण्याचा कायदेशीर अधिकार आहे तरीही तहसीलदार खोमणे यांनी समिती गठीत न करता पुराव्यांची तपासणी केली. विनाकारण गुन्हा नोंदविण्याचे आदेश दिले ही पूर्णपणे बेकायदेशीर आणि हुकूमशाही वृत्ती आहे तरीही तहसीलदार व पोलिसांनी हा गुन्हा ठरवून नागरिकांना त्रास देण्यास सुरुवात केली आहे. पोलिसांवरही मनमानी, लाचार आणि भ्रष्टाचाराचे आरोप होत आहेत . ज्यांची नावे तक्रारीत नाहीत त्यांनाही पोलीस ठाण्यात बोलावून पैशाची मागणी केली जात आहे हे सरळ ही लूटमाराची कृती आहे. जन्म दाखला घेणे गुन्हा आहे का ?

आहे हे सरळ ही लूटमाराची कृती आहे. जन्म दाखला घेणे गुन्हा आहे का ? कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ही नागरिकांना का त्रास दिला जात आहे ? सर्वसामान्यांच्या समस्या बाबत तहसीलदार व पोलीस का अनभिज्ञ आहेत ? स्थानिक नेते हे या प्रश्नाकडे लक्ष घालून जनतेला दिलासा देणार का? असे नागरिकांमध्ये तिखट प्रश्न निर्माण होत आहेत.

## मेहुण्याने अल्पवयीन मेहुणीचा केला विनयभंग

केज । प्रतिनिधी

पत्नीशी जमत नसल्याने ती माहेरी गेली यावेळी सासऱ्याच्या घरात शिरून अल्पवयीन मेहुणीचा तरुणाने विनयभंग केल्याची घटना केज तालुक्यात घडली.याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. केज तालुक्यातील एका गावातील तरुणाची पत्नी ही आपसात पटत नसल्याने माहेरी राहते. त्याच्या गावापासून जवळच असलेल्या सासुरवाडीत जाऊन संबंधित तरुणाने सासू सासरे घराबाहेर झोपल्याची संधी साधून घरात एकटीच झोपलेल्या अल्पवयीन मेव्हणीचा घरात घुसून विनयभंग केला. पीडित मेव्हणीने आरडाओरडा करण्याची धमकी देताच संबंधित तरुणाने हा प्रकार कोणाला सांगितल्यास गळा दाबून जीवे मारण्याची धमकी देत घरातून निघून गेला. त्यानंतर सासू सासऱ्याने त्याच्या घरी जाऊन जाब विचारला असता त्यांना संबंधित जावई व त्याच्या आईने खोटे आरोप करू नका, असे म्हणत शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली. अशी तक्रार पीडित आहे.

## अप्पर पोलीस अधिक्षकांच्या साक्षीने पोलिस उपनिरीक्षक दादासाहेब केदार यांचा सेवापुर्ती सोहळा संपन्न



बीड । प्रतिनिधी

अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या उपस्थितीत पोलीस उपनिरीक्षक दादासाहेब केदार यांचा सेवापुर्ती समारंभ सोहळा हॉटेल ऑलीव्ह नगर नाका येथे संपन्न झाला. यावेळी या सेवापुर्ती सोहळा समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून समाजसेवक व उद्योजक नितीन कोटेचा, वारणी गावचे सरपंच ज्ञानदेव केदार, पंचायत समिती माजी सभापती बाबुराव केदार, काँग्रेस शिरुर तालुकाध्यक्ष भास्कर केदार, जिल्हा महिला बालविकास अधिकारी कालिदास बडे, पाडळीचे माजी सरपंच रामदास हंगे,जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सहाय्यक पोलिस निरीक्षक सुभाष सानप, जिल्हा वाहतुक शाखेचे पोलिस उपनिरीक्षक विजय जाधवर, सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक अरुण डोंगरे, सेवानिवृत्त शिक्षक बाबासाहेब डोंगरे, प्रा.भानुदास खेडकर, सेवानिवृत्त पीएसआय परमेश्वर सानप, बाबासाहेब जायभाये, पोलिस उपनिरीक्षक वसुदेव मिसाळ यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात बोलतांना अप्पर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर म्हणाले की, पोलीस उपनिरीक्षक दादासाहेब नारायण केदार हे १९८९ साली नागपूर रेल्वे पोलीसमध्ये भरती झालेले होते बीड जिल्ह्यात १९९८ साली बदलून आले. जिल्ह्यात त्यांनी बीड ग्रामीण, आष्टी, अप्पर पोलिस अधिक्षक कार्यालय, स्थानिक गुन्हे शाखा आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभाग या ठिकाणी नौकरी केली आहे या त्यांच्या ३७ वर्षाच्या कालखंडात त्यांनी नौकरी करत असतांना नौकरी हाच धर्म आहे.

### अमृताश्रम स्वामी जोशी महाराज यांचा चातुर्मास समाप्ती शिमोलंघन सोहळा संपन्न

बीड । प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी दंडी संन्याशांचा चातुर्मास समाप्ती व चातुर्मास व सीमोलंघन कार्यक्रम मोठ्या थाटात आज दिनांक ७/९/२०२५रोजी संपन्न झाला. नवगण राजुरी येथील दंडी संन्यासस्थ अमृताश्रम स्वामी जोशी महाराज यांच्या शिमोलंघगण व चातुर्मास समाप्ती निमित्त यशवंत नगर येथे मुकुंद भुतपल्ले यांच्याकडे पाद्य पूजा करून ज्ञानोबा तुकाराम यांच्या नाम गजरात सवाद्य मिरवणूक काढण्यात आली होती. मिरवणूक श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर येथे आल्यानंतर या ठिकाणी महाराजांनी जमलेल्या भक्तगणांना व श्रोत्यांना दंडी संन्याशाचे महत्व विशद केले.

## तलवाडा पोलीस प्रशासन, ग्रामपंचायत प्रशासक, व सर्व गणेश मंडळाचे जाहीर व विशेष अभिनंदन!

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील येथे पोलीस प्रशासनाच्या सूचना व आदेशा नुसार सर्व गणेश मंडळाने गणपती बप्पाच्या स्थापना पासुन ते विसर्जना पर्यंत गेली दहा दिवस विविध सामाजिक उपक्रम राबवत प्रतीवर्षा प्रमाणे छान पध्दतिने स्थापना विसर्जन पार पाढले, तलवाडा येथील सर्वच गणेश मंडळाचे विशेष कवतुक अभिनंदन व आभार व्यक्त होने हे क्रमप्रत असुन ते होऊ ही लागले आहे. आणेक गणेश भक्तांच्या तोंडुन मंडळांप्रती कवतुकास्पद ऊदगार ऐकावयास मिळत आहेत. त्याच बरोबर तलवाडा पोलीस प्रशासन व तलवाडा ग्रामपंचायत प्रशासक ग्रामपंचायत कर्मचारी यांनी देखील



विसर्जन काळात समता परिषदेचे गेवराई तालुकाध्यक्ष बाप्पु अण्णा गाडेकर यांनी केलेल्या कल्लोळ तिर्थात गणपती विसर्जन न करण्याच्या सूचनेला प्रतिसाद देत कल्लोळ तिर्थ ऐवजी इतरत्र विसर्जन व्यवस्था केल्याने त्वरितादेवीच्या सर्व भाविक भक्तांना मिळालेल्या दिलास्यामुळे व कल्लोळ तिर्थ कुंडाचे पवित्र्य जोपासन्यासाठी सहकार्य केल्या बद्दल विशेष अभिनंदन व आभार व्यक्त करण्यात येत आहे.

# गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या.. घोषणांचा जयघोष!

**कृषिकुलच्या बाप्पांना भक्तिभावात भावपूर्ण निरोप**

सिरसाळा । प्रतिनिधी

जलनायक मयंक गांधी यांनी स्थापित केलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शेतकरी प्रशिक्षण केंद्र असलेल्या कृषिकुल येथे यंदाचा गणेशोत्सव भक्तिभावात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. गणरायाच्या मूर्तीचे विधिवत विसर्जन करताना संपूर्ण परिसर गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या! आदि घोषणांच्या गजराने दुमदुमून गेला.



विसर्जनाच्या दिवशी कृषिकुलच्या सर्व कर्मचाऱ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. ढोल, ताशा, हालगीच्या तालावर लेझीमच्या पारंपरिक निनादात श्रीगणेशाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. गणपती चालले गावाला चैन पडेना जिवाला अशा भावस्पर्शी घोषणा देत भक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला. गणेशोत्सवाच्या काळात दररोज श्रींची आरती विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते करण्यात येत होती. संपूर्ण कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला. कृषीकुल येथे स्थापित बाप्पाची विसर्जन मिरवणूक खास आकर्षण ठरली. या भक्तीभावपूर्ण प्रसंगात कृषिकुलचा संघभाव, श्रद्धा आणि पारंपरिक सांस्कृतिक वारसा यांचे सुंदर दर्शन घडले.


## स्वराज्य महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बीड.

मुख्य कार्यालय : जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नगर रोड, बीड

### वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

(फक्त सभासदांसाठी)

जा.क्र.एस.बी.एस.वा.सभा/२०२५–२६ दिनांक १०/०९/२०२५

स्वराज्य महिला नागरी सभा गुरूवार दि. २५/०९/२०२५ रोजी ११.३० वा शाखा १ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नगर रोड, बीड या ठिकाणी अध्यक्ष सौ. शिंदे शुभांगी अशोक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेला उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय :–**

१. मागील वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
२. संचालक मंडळाने सादर केलेला ३१ मार्च २०२५ अखेरचा वार्षिक अहवाल नफा– तोटा पत्रक, तेरिज पत्र, व ताळेबंद पत्रकाचे वाचन व त्यास मान्यता देणे.
३. आर्थिक वर्षे २०२४–२५ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालास मान्यता देणे.
४. आर्थिक वर्षे २०२४–२५ च्या वैधानिक लेखापरिक्षण मधील दोष दुरूस्ती अहवास मान्यता देणे.
५. आर्थिक वर्षे २०२४–२५ वर्षातील नफा विभागणीस मान्यता देणे.
६. आर्थिक वर्षे २०२३–२४ च्या अंदाजपत्रकापेक्षा कमी जास्त आलेला जमा खर्च मंजूर करणे.
७. आर्थिक वर्षे २०२४–२५ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
८. आर्थिक वर्षे २०२४–२५ च्या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखा परिक्षकांची नियुक्ती करून मानधन निश्चित करणे.
९. एक रक्कमी कर्ज (समिचार) परतफेड योजना संचालक मंडळाने स्विकारलेल्या निर्णयाची नोंद घेणे व या अंतर्गत मंजुर केलेल्या प्रकरणाची नोंद घेणे.
१०. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती प्रमाणित करणे.
११. मा. अध्यक्षांच्या अनुमतीने एनवेळी येणाऱ्या विषयावर निर्णय घेणेबाबत.
१२. नवीन घटना दुरूसती स्वाकारणे बाबत.

**विशेष सुचना : –**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे नियम क्र. २२(क) प्रमाणे आवश्यक असणारी गणसंख्या सभेच्या कामकाजाच्या प्रारंभी नसेल तर सभेचे कामकाज अर्धा तास तहकुब करण्यात येईल. नंतर त्याचे ठिकाणी कार्यक्रम पत्रिकेप्रमाणे सभेचे कामकाज सुरू केले जाईल. त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.
२. कोणत्याही सभासदास संस्थेचा कामकाजाविषयी काही प्रश्न विचायवयाचे असल्यास दि. २०/०९/२०२५ पुर्वी संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील अशा रितीने लेखी स्वरूपात पाठवावे. त्यानंतर विचारलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही. यांची नोंद घ्यावी.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
स्वाक्षरित
सौ. शिंदे शुभांगी अशोक,
अध्यक्ष /
मुख्य कार्यकारी अधिकारी
स्वराज्य महिला नागरी सहकारी पतसंख्या मर्या. बीड

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. ०८ सप्टेंबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### अजित दादा नावाचा भाऊ कामगार वहिणीच्या पाठीशी

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी कामगार सेल राज्य उपाध्यक्ष नगरसेवक अमर शेख यांनी पंधरा दिवसीय कामगार प्रशिक्षण शिबीर महाराष्ट्र कामगार म जूर संघटनेच्या वतीने जय हिंद महाविद्यालय येथे आयोजित केले . यावेळी शहराचे नेते शेख निजाम भाई सोबत कामगारांशी सवांद साधला . यावेळी सरकार मधील उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी नेहमीच महिला सबलीकरण व स्वाभिमानी जीवन यावर भर दिलेला आहे . सरकार कडून कामगार बांधवासाठी ३८ योजना राबवत आहे .या प्रशिक्षण शिबीरात सहभागी होणाऱ्या बांधवांना ४२०० रु थेट अकाउंट मध्ये प्रशिक्षण भत्ता जमा होणार आहे ज्या साठी अमर शेख व त्यांचे जिल्हा प्रमुख शेख निसार भाईने प्रयत्न केले . अजित दादा पवार व राष्ट्रवादी सर्व महिलांच्या उष्कर्ष व स्वावलंबी जीवनाला बांधील आहेत . यावेळी कामगार विकासाच्या विविध प्रश्नावर चर्चा झाली

### सोमवारी ह.भ.प.संतोष महाराज डोंगरे यांची प्रवचन सेवा



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बार्शी रोड वरील स्वराज्य नगर येथील रहिवाशी व बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कीर्तनकार, ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या माऊली निवास्थानी प्रतीवर्षा प्रमाणे यावर्षी ही चातुर्मास उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे, आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या पवित्र पर्वकाळात प्रती सोमवारी रात्री ८ ते ९ यावेळेत विविध ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रेमी महाराज मंडळींची श्री ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा संपन्न होत आहे. या चातुर्मास उत्सवा निम्मित सोमवार दिनांक ८/९/२५ रोजी रात्री ८ते९ या वेळेत ह भ प संतोष महाराज डोंगरे बीड यांची प्रवचन सेवा होणार आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके काठवडेकर या फेसबुक अकाऊंट वरून होणारअसून, या चातुर्मास उत्सवात आपण सर्वांनी सहभागी होऊन श्री ज्ञानेश्वरी प्रवचन श्रवणनाच लाभ घ्यावा असे आवाहन ह भ प माधव महाराज डाके यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### राजमाता जिजाऊ महाविद्यालया मध्ये क्रांतिकारक उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्ताने अभिवादन



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये दि. ७ सप्टेंबर २०२५ रोजी डॉ. अनंथा गाडे यांच्या हस्ते क्रांतिकारक उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्ताने प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक विभागाचे सदस्य प्रा. नागोराव वाघमारे, प्रा. सिद्धेश्वर काळे, प्रा. धनराज सोळंके, प्रा. राजू पांचाळ, प्रा. रणजीत शिनगारे, सुधाकर शिंदे, जितेंद्र पवार, पंडित मामा यांबरोबरच सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

### पिंपळवाडी हायस्कूल विद्यालयात आद्य क्रांतिवीर उमाजी नाईक यांची जयंती संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

पिंपळवाडी हायस्कूल पिंपळवाडी विद्यालयात आद्य क्रांतिवीर उमाजी नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेतीचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक आदरणीय प्रदीप जगताप सर हे होते. उपक्रमशील आदरणीय प्रदीप जगताप सर यांच्या हस्ते आद्यक्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आद्यक्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक खटाने सर यानी केले. ढगे सर, श्री देशमाने सर, भरणे सर व जोशी सर यांनी आद्यक्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या कार्याविषयी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष आदरणीय प्रदीप जगताप सर यांनी आद्यक्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या कार्याविषयी सखोल माहिती सांगितली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाईकवाडे सर यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार चौधरी सर यांनी मानले प्रसंगी शाळेतील ज्येष्ठ शिक्षक ढगे सर, जोशी सर, येवले सर, गाडेकर सर, चौधरी सर, देशमाने सर, काशीद सर, भरणे सर, खटाणे सर, नाईकवाडे सर, शेवंते सर, जाधव सर, कोळेकर सर, वाघमारे सर, देशमाने बाळासाहेब, दत्ता साळवे तसेच सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात उपस्थित राहून शाळेत आद्यक्रांतिकारक उमाजी नाईक यांची जयंती संपन्न केली.

### सौ.के.एस.के. महाविद्यालयात आद्यक्रांती गुरू राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आद्यक्रांती गुरू राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेला उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे यांनी पुष्पहार अर्पण करून जयंती करण्यात आली. राजे उमाजी नाईक यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानून गनिमी काव्याने ब्रिटिशांवर हल्ले करून ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले होते. इंग्रजांचे खजाने लुटून गोरगरिबांना व मंदीरासाठी ते दान केले. ते महिलांच्या संरक्षणासाठी सतत धावून जात असत व त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करत असत त्यांनी अनेक क्रांतिकारक घडविले.माझ्या देशावर मी परकियांना राज्य करू देणार नाही. असे ते ठणकावून सांगत. नागरिकांच्या हृदयामध्ये स्वातंत्र्याची जाणीव व चळवळ जागी केली. म्हणून ते आद्यक्रांती गुरू म्हणून ओळखले जातात.

# सिंदफणात पाणी, उपकालवा सर्व्हेक्षणासाठी विखे पाटील यांच्या सूचना

## लोकलढा समन्वयक व विखे पाटील यांच्यात संवाद



**बीड । प्रतिनिधी**

जायकवाडी धरणाचे पाणी लिफ्ट करून सिंदफणा नदीपात्रात सोडावे व मातोरी, मादळमोही, गढी, सिरसदेवी या महामार्ग लगत उपकालवा करावा यासाठी गेल्या दीड वर्षापासून १४० गावातील शेतकऱ्यांनी लोकलढा आंदोलन उभे केले आहे. या आंदोलनातील समन्वयकांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली. या दोन्ही योजनेसाठी सर्वे करावा अशा लेखी सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. यावेळी भाऊसाहेब जरांगे पाटील, बालासाहेब शेरकर, देविदास चव्हाण, राहुल लोंढे, गणेश जाधव व दिनेश गुळवे हे उपस्थित होते. बीड जिल्ह्यातील वंचित भागांना पाणी मिळावे यासाठी गेल्या दीड वर्षापासून १४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनांतर्गत शेतकऱ्यांनी छत्रपती संभाजीनगर, सिरसमार्ग व तांदळा अशा तीन ठिकाणी आतापर्यंत उपोषण केलेले आहे. शिरूर, बीड, गेवराई, माजलगाव व वडवणी या तालुक्यातील शेतकऱ्यांना जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे यासाठी जायकवाडी धरणातून लिफ्ट करून पाणी सिंदफणा

▶ उर्वरित पान २ वर

### १४० गावांना विखे पाटील देणार न्याय

**बीड जिल्ह्यात सतत दुष्काळ पडत असल्याने शेतकरी आत्महत्या, ऊसतोड मजूर, बेरोजगारी, स्थलांतर अशा अनेक समस्या आहेत. शेतीला बारमाही पाणी नसल्याने आपले शेतकरी आर्थिक उन्नत नाहीत. शेती व शेतकरी सुधारण्यासाठी शेतीला बारमाही पाणी मिळावे, यासाठी १४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या दुष्काळी भागातील शेतकऱ्यांसाठी ही योजना महत्वाची आहे. ही योजना करून शेतकऱ्यांना न्याय देऊ असा विश्वासही यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.**

# बोरगाव अंजनपूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी 14 कोटींचा निधी मंजूर; नवीन उभे उचल दरवाजे बसवण्यात येणार

## आ. नमिता मुंदडा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर मिळाले यश



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील बोरगाव अंजनपूर येथील निम्न पातळी बंधाऱ्याच्या दुरुस्ती व नवीन उभ्या उचल द्वारे बसवण्याच्या कामाला शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. या कामासाठी तब्बल १३ कोटी ९० लाख १५ हजार ७८० रुपयांचा खर्च मंजूर करण्यात आला असून लवकरच याची निविदा निघणार आहे.

या प्रकल्पासाठी केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी गेली ३ ते ४ वर्षे सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा केला होता. मंत्रालयात अनेक बैठका घेण्यात आल्या. तसेच विधानसभा अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करून या प्रकरणाला गती देण्यात आली होती. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. सन २००८ मध्ये बांधण्यात आलेल्या या बंधाऱ्याच्या गोडबोले पद्धतीच्या द्वारे, हायड्रॉलिक पंप, जॅक, असेंब्ली आदी भाग २०२१ पासून निष्क्रिय झाले होते. त्यामुळे पाणीसाठा होऊ शकत नव्हता. शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामात पाणीपुरवठ्याची अडचण निर्माण झाली होती. आता नवीन उभ्या उचल पद्धतीचे सात दरवाजे बसवले जाणार असून, यामुळे दरवर्षी शंभर टक्के पाणीसाठा होऊ शकेल, देखभाल खर्चही मोठ्या प्रमाणात कमी होईल. हे काम पूर्ण झाल्यानंतर ३१० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार असून, खरीप आणि रब्बी हंगाम दोन्ही हंगामात शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री पंकजाताई ▶ उर्वरित पान २ वर

### स्वराज्य जनजागृती परिषदेच्या कार्यकर्त्यांचा मराठवाडा विभागीय मेळावा

## १४ सप्टेंबर रोजी मोठ्या संख्येने उपस्थित रहा : ॲड. अजित देशमुख



**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक स्तरावर मोठ्या प्रमाणात काम करण्यासाठी स्वराज्य जनजागृती परिषदेची स्थापना झाली आहे. या माध्यमातून लोकशिक्षण आणि लोकजागृतीसाठी कार्यकर्त्यांची फळी तयार करायची आहे. त्याच बरोबर भ्रष्टाचाराला विरोध देखील कायम ठेवायचा आहे. परिषदेच्या कार्यकर्त्यांचा मराठवाडा विभागीय स्तरावरील मेळावा रविवार दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित केला असून या मेळाव्याला सर्व स्तरातील कार्यकर्त्यांनी आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी केली आहे. दिनांक १४

▶ उर्वरित पान २ वर



*बीड– मराठा समाजभूषण माजी मंत्री आमदार प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्याकडून नुकत्याच पार पडलेल्या मुंबई येथील मराठा आंदोलनातील आत्महत्याग्रस्त स्व.सतीश ज्ञानोबाराव देशमुख मु. पो.वरपगाव ता.केज जि.बीड, स्व. भारत यादव खरसाडे, आहेर वडगाव तालुका जिल्हा बीड, स्व. महारुद्र शिवाजी खाकरे, वाकणातपूर तालुका जिल्हा बीड यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी तीन लाख रुपये आर्थिक मदत केली. यावेळी मराठा क्रांती मोर्चा राज्य समन्वयक महेश डोंगरे पाटील, अ.भा.छावा. जिल्हाप्रमुख अशोक (अण्णा) रोमन, बीड जिल्हा शिवसेना प्रमुख स्वप्नील गलधर, स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख, नाना महाराज लांडे, वाजेद खान, पप्पू शिंदे, अविनाश पवार, पप्पू लांडे पाटील, मस्साजोग, गजानन देठे महाराज, संजीवनी ताई देशमुख, शिवाजी मुळीक, प्रभाकर शेंडगे, अमोल बसाड, श्रीकांत जाधव, इत्यादी उपस्थित होते.*

# 'घरकुल'चे नवीन हप्ते १ला, व २रा, ३रा तात्काळ वाटप करा शिष्टमंडळाची मागणी

## १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तीसंग्रामदिना दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे निदर्शने



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर नगरपालिका परिसरातील पहिला दुसरा तिसरा थकीत हत्या साठी शिष्टमंडळांनी घेतली शेवटची भेट दि. ४ सप्टेंबर २०२५ रोजी शिष्टमंडळाने पुन्हा एकदा न.प.मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची समक्ष भेट घेऊन रमाई घरकुल आवास योजनेचे थकित आणि नवीन हप्ते पहिला दुसरा आणि तिसऱ्याची तात्काळ वाटप करावी अशी मागणी करण्यात आली आहे. रमाई घरकुल योजनेचा पहिला दुसरा आणि तिसरा हप्ता तात्काळ न दिल्यास १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती दिना दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे निदर्शने करण्यात येतील असा इशारा शिष्टमंडळाने न.प. मुख्याधिकारी शैलेश फडसे यांना देण्यात आला. सदरिल शिष्टमंडळात सर्व चळवळीतील प्रमुख कार्यकर्ते आणि माजी नगरसेवक उपस्थित होते त्यात बबन वडमारे,गणेश वाघमारे,ॲड. राहुल मस्के अशोक वीर,भीमराव वाघचौरे, विकास,जोगदंड अमोलजी पोळ,विनोद सवाई, स्वप्निल हातागळे इत्यादी यावेळी भारत ▶ उर्वरित पान २ वर

# मराठा समाजाची बाजू ऐकूण घेतल्याशिवाय आरक्षणाबाबतचा जीआर रद्द करु नये

## गंगाधर कळकुटें यांच्या कडून सुप्रीम कोर्ट, उच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल

**बीड । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील यांचे सम र्थक मराठा सेवक गंगाधर काळकुटे यांच्याकडून सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयात मराठा आरक्षणाच्या जीआरबाबत कॅव्हेट दाखल करण्यात आले

मनोज जरांगे पाटील यांचे समर्थक गंगाधर काळकुटे यांच्याकडून सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयात मराठा आरक्षणाच्या जीआरबाबत कॅव्हेट दाखल करण्यात आले आहे. पाच पानांचे कॅव्हेट दाखल करण्यात आले आहे. मराठा समाजाची बाजू ऐकून घेतल्याशिवाय मराठा आरक्षणाबाबतचा कोणताही जीआर रद्द करु नये किंवा याबाबत कोणताही निर्णय घेण्यापूर्वी आम्हाला विचारात घ्यावे असं



या कॅव्हेटमध्ये म्हटलं आहे. मराठा आरक्षण आणि हैदराबाद गॅझेटला होणारा विरोध लक्षात घेता काळकुटे यांच्या माध्यमातून हे कॅव्हेट दाखल केले आहे.

ओबीसी समाज न्यायालयात या गॅझेटला आव्हान देण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालय अथवा उच्च न्यायालयाकडून या जीआरला स्थगिती देण्याची परिस्थिती निर्माण झाली तर मात्र मराठा समाजाला म्हणणं मांडता येईल. त्यानंतर कोणताही कायदेशीर निर्णय हा घेतला जाऊ शकतो. काही लोक न्यायालयात जाण्याची शक्यता आहे. त्यामुळं काळकुटे यांच्या माध्यमातून कॅव्हेट दाखल करण्यात आला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करुनच ▶ उर्वरित पान २ वर